# महिला व पुरुष कबड्डी संघाकरिता नव्याने नेमणूकीसाठी अटी व शर्ती :-

१. महिला व पुरुष खेळाडूंचा नव्याने कबड्डी संघ तयार करतांना या खेळातील शिवछत्रपती पुरस्कार पात्र खेळाडू, जिल्हा व राज्य संघटनेच्या माध्यमातुन व राष्ट्रीय संघटनेच्या अधिकृत स्पर्धा यातून खेळलेला खेळाडू असे महिला कबड्डी संघाकरीता १२ खेळाडू व पुरूष कबडी संघाकरीता ६ खेळाडूंची निवड करण्यात येईल. १२ खेळाडू पैकी एखादा खेळाडू महापालिकेशी करार करण्यास तयार नसल्यास प्रतिक्षा यादीतील गुणाक्रमांने प्रथम क्रमांकापासून प्राधान्य देऊन खेळाडूची नियुक्ती करण्यात येईल. त्यास मान्यता असावी.

२. सदरहू खेळांडूची नावे निश्चित करताना यामध्ये ज्युनिअर राष्ट्रीय / राष्ट्रीयस्तरावर / प्रो. कबड्डी स्तरावर / राज्यस्तरावर विद्यापीठ स्तरावर संघाचे प्रतिनिधीत्व केलेल्या पुरुष व महिला खेळाडुंना निवड चाचणीस बोलविणेबाबतचा निर्णय प्रशासनाचा राहील.

३. महिला व पुरुष संघाकरिता नव्याने अर्ज करणाऱ्या खेळाडूचे वयोमर्यादा पुरुषाकरिता कमाल वय वर्ष ३० व महिलांकरिता कमाल वय वर्षे २५ असावे. त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या खेळाडूचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच यापुर्वी महापालिकेच्या संघातून खेळलेल्या खेळाडूस वयाची अट शिथील असेल.

४. खेळाडूंच्या नियुक्त्या शासनाने सुचित केल्याप्रमाणे विहित नियमानुसार कंत्राटी/ करार पद्धतीने असतील. त्यांना सेवेत कायम स्वरूपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

५. नव्याने अर्ज करणारा खेळाडू हा मागील ३ वर्षे (सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२१-२०२२) या वर्षात उपरोक्त अनु. क्र. २ मध्ये नमुद केलेल्या स्तरावरील खेळलेला असावा, त्यापूर्वी खेळलेल्या प्रमाणपत्राचा विचार केला जाणार नाही.

६. नविन पुरुष व महिला कबड्डी संघाकरिता विहित कालावधीत फक्त ऑनलाइन पध्दतीनेच अर्ज स्वीकरण्यात येतील, ऑफलाईन पध्दतीने कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही, तसेच टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. तसेच जाहिरातीच्या मुदतीबाह्य अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

७. अर्जदार खेळाडूच्या पायाची, गुडघ्याची व इतर शस्त्रक्रिया केलेली असल्यास सदर खेळाडू कबड्डी खेळण्याकरीता वैद्यकीय दृष्ट्या सक्षम आहे (फीट सटीफिकेट) / डॉक्टरांचे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर शस्त्रक्रियेबाबत अर्जदाराने माहिती लपविल्याचे निदर्शनास आल्यास सदर खेळाडूस त्वरीत निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. त्याचप्रमाणे संघात नियुक्ती झाल्यानंतर सदर बाब निदर्शनास आल्यास त्या खेळाडूस संघातून कमी करण्यात येईल.

८. खेळाडूंची निवड चाचणी ही महापालिकेच्या दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहात इन कॅमेरामध्ये घेण्यात येईल. निवड चाचणीकरीता फक्त खेळाडूस प्रवेश दिला जाईल. त्याव्यतिरिक्त सोबत आलेले खेळाडूचे प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक व अन्य कोणत्याही व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही.

९. निवड चाचणीमध्ये काही हरकत व वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्यासाठी मा. आयुक्त सो. हे एकमेव लवाद असतील व त्यांनी दिलेल्या निर्णय अंतिम व सर्वपक्षी बंधनकारक असेल.

१०. नव्याने तयार करण्यात येणाऱ्या पुरुष व महिला कबड्डी संघाकरिता घेण्यात येणारी निवड चाचणी महापालिकेकडून नियुक्त निविड समिती मार्फत करण्यात येईल. सदर निवड समितीने घेतलेले निर्णय अंतिम असतील व ते सर्व खेळाडू उमेदवारास बंधनकारक राहतील.

## महापालिकेमार्फत नेमणूक करण्यात आलेले खेळाडू महिला व पुरुष कबड्डी संघातील निवड झालेल्या खेळाडूंकरिता नियमावली व महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे :-

१. निवड झालेल्या खेळाडूंना नियमित सरावास उपस्थित राहणे बंधनकारक राहील. तसेच खेळाडूने नमुद केल्याप्रमाणे सराव व कार्यालयीन कामकाजनुसार उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

२. ठाणे महानगरपालिकेच्या सरावा दरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास त्यावरील उपचार महानगरपालिका रूग्णालयात मोफत करण्यात येईल. दुखापत झालेल्या खेळाडूंने पूर्ण बरे झाल्याशिवाय सरावास हजर राहू नये.

३. संघामधील एखाद्या खेळाडूची राज्य पातळीवर अथवा राष्ट्रीय पातळीवर निवड झाली असल्यास संबंधित खेळाडूने ठा.म.पा.ची मान्यता घेतल्याशिवाय सदर स्पर्धांचे कॅम्प अथवा स्पर्धामध्ये सहभाग घेता येणार नाही. परवानगी न घेता अशा स्पर्धामध्ये सहभाग घेतल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

४. ठाणे महानगरपालिकेच्या संघा व्यतिरिक्त संघातून खेळावयाचे असल्यास संबंधित खेळाडूने ६ दिवस पुर्वी क्रिडा अधिकरी तथा प्र. उपआयुक्त (क्रिडा) यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. तशी परवानगी न घेता जर खेळाडू दुसऱ्या इतर संस्थेच्या संघातून स्पर्धामध्ये सहभागी झाल्यास संबधित खेळाडूंवर कारवाई करण्यात येईल व त्याचा हा कालावधी विनावेतन करण्यात येईल.

५. संघातील एखाद्या खेळाडूंचे गैरवर्तन होत असेल किंवा एखादा खेळाडू संघामध्ये भांडण-तंटे निर्माण करत असेल तर अशा खेळाडूंवर तातडीने कारवाई करून त्यास संघातून कमी करण्यात येईल.

६. अनुभवी खेळाडूंकडून नवोदित खेळाडूस काही असभ्य वर्तणूक होत असेल (रॅगिंग) तर त्यांच्यावर त्वरीत कारवाई केली जाईल.

७. एखादा खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्याचा करार रद्द करण्यात येईल. त्याकरीता उर्वरीत निवड झालेल्या प्रतिक्षा यादीतील खेळाडूला नियुक्त करण्यात येईल. त्यास रक्कम रू.५००च्या स्टॅम पेपरवर बंधपत्र (करारनामा) द्यावा लागेल.

८. करार / कंत्राटावर नियुक्ती करण्यात आलेले खेळाडूंचा वार्षिक प्रगतीचा आढावा घेऊन पूढील करार वाढविण्याबाबत मा. आयुक्त सो यांचेकडे प्रस्तावित करण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांना असतील.

९. ठाणे महानगरपालिका संघ कोणत्याही स्पर्धेत सहभागी झाल्या नंतर स्पर्धेत पारितोषिक रक्कम मिळाल्यास सदर मिळालेली रक्कम स्पर्धेत सहभागी खेळाडू, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांना १००% वाटप करण्यात येईल. मात्र स्पर्धेतील चषक ठाणे महानगरपालिका क्रिडा विभागात जमा करतील.

१०. स्पर्धेत संघाच्या सहभागासाठी जर स्पर्धा आयोजक प्रवास खर्च अदा करणार नसतील, तर अशा स्पर्धेत सहभागी (जाणे-येणेकरीता) येणारा प्रवास खर्च, तसेच प्रवासा दरम्यान येणारा खर्च महापालिकेच्या वतीने करण्यात येईल.

११. निवड झालेल्या खेळाडू व मार्गदर्शक यांना सराव व स्पर्धेदरम्यान क्रिडा गणवेश व इ. आवश्यक साहित्य आवश्येकतेनुसार मोफत उपलब्ध करून देण्यात येईल. खेळाडूंना देण्यात येणारे गणवेष व इतर साहित्य यांचा वापर खेळाडूंनी फक्त ठा.म.पा. मार्फत स्पर्धा खेळतांनाच करायचा आहे. त्याव्यतिरिक्त खाजगी संघामार्फत खेळतांना जर सदर गणवेश व इतर साहित्याचा वापर केल्यास संबंधित खेळाडूंवर शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

१२. खेळाडूंना एकुण मासिक ठोक मानधनाव्यतिरिक्त नियमीत कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर कोणतेही हक्क / आधिकार / लाभ मिळणार नाहीत.

१३. उक्त नमुद नेमणुक मासिक ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात असेल. खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करार समाप्त करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांचे राहतील.

१४. उक्त अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांच्या कागदपत्राची छाननी करून निवड चाचणीस बोलविण्यात येईल.